महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४६ वे | दिनांक : ०२/०९/२०२६ | वार : बुधवार

# पुणे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता परीक्षेत गैरप्रकार




**पुणे :** महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदासाठी घेण्यात आलेल्या भरती परीक्षेत हायटेक पद्धतीने गैरप्रकार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. छत्रपती संभाजीनगरमधील चिखलठाणा येथील परीक्षा केंद्रावर तीन उमेदवारांनी चष्म्यामध्ये बसवलेल्या छुप्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून संगणकाच्या स्क्रीनवरील प्रश्नांची छायाचित्रे घेतल्याचा संशय आहे. त्यानंतर ही माहिती परीक्षा केंद्राबाहेर पाठवून त्याच्या आधारे प्रश्न सोडवण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.

पुणे महापालिकेने 169 कनिष्ठ अभियंता पदासाठी 2024 मध्ये भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. विविध कारणांमुळे परीक्षा अनेक वेळा पुढे ढकलण्यात आली. अखेर एप्रिल 2026 मध्ये विविध शहरांतील परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये हजारो उमेदवारांनी परीक्षा दिली.

परीक्षेनंतर प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर आणि टेलिग्रामवर प्रसारित झाल्याची माहिती महापालिकेला मिळाली. त्यानंतर परीक्षा प्रक्रियेची जबाबदारी असलेल्या IBPS आणि TCS यांच्याकडे याबाबत तांत्रिक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. तपासादरम्यान चिखलठाणा केंद्रातील तीन उमेदवारांच्या हालचाली संशयास्पद असल्याचे आढळून आले.

महापालिका आणि परीक्षा यंत्रणेकडून संबंधित उमेदवारांच्या डिजिटल हालचाली, परीक्षा लॉग आणि CCTV फुटेजची तपासणी करण्यात आली. या तपासात तीन उमेदवारांचा परीक्षा देण्याचा पॅटर्न संशयास्पद असल्याचे दिसून आले. परीक्षा सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात या उमेदवारांनी प्रश्न सोडवण्याऐवजी बराच वेळ घेतला. त्यानंतर तिघेही वॉशरूममध्ये गेल्याचे CCTV फुटेजमध्ये दिसून आले. वॉशरूममधून परत आल्यानंतर त्यांच्या प्रश्न सोडवण्याच्या वेगात अचानक बदल झाल्याचे डिजिटल लॉगमधून आढळले. विशेष म्हणजे, परीक्षेच्या शेवटच्या टप्प्यात त्यांनी मोठ्या संख्येने प्रश्न सोडवले आणि 90 पेक्षा अधिक गुण मिळवल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे या तिघांबाबतचा संशय अधिक बळावला. तांत्रिक तपासादरम्यान प्रश्नपत्रिकेची छायाचित्रे काढण्यासाठी चष्म्यामध्ये सूक्ष्म कॅमेरा बसवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. कॅमेऱ्याच्या मदतीने संगणकाच्या स्क्रीनवरील प्रश्न बाहेर पाठवले जात होते आणि त्यानंतर बाहेरून उत्तरे मिळवून ती परीक्षा देताना वापरली जात असल्याची प्राथमिक माहिती तपासातून समोर आली आहे.

महापालिकेने मोठ्या संख्येने उमेदवारांच्या डिजिटल हालचालींचे विश्लेषण केल्यानंतर संबंधित तीन उमेदवारांवर विशेष लक्ष केंद्रित केले. या तपासामुळे साध्या नजरेला सहज लक्षात न येणाऱ्या 'कॅमेरा चष्म्या'चा वापर करून केलेल्या कॉपीचा प्रकार उघडकीस आल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणात गजानन पाचे, शिवशंकर शेळगावे आणि विष्णु कांत वाघमारे या तीन उमेदवारांची नावे समोर आली आहेत. या तिघांनी परीक्षेत गैरप्रकार केल्याचा आरोप असून, त्यांना बाहेरून मदत करण्यात आल्याचाही तपास यंत्रणेला संशय आहे. परीक्षा केंद्राशी संबंधित असलेल्या व्यक्तींचीही चौकशी करण्यात आली. TCS शी संबंधित योगेश राठोड आणि विकास गायकवाड यांनी या उमेदवारांना गैरप्रकारात मदत केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी तीन उमेदवारांसह संबंधित कर्मचाऱ्यांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासात आणखी एका व्यक्तीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, पोलिसांकडून त्याचाही शोध घेतला जात आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर, लातूर, हिंगोली आणि जालना या भागात स्वतंत्र पथके तयार केली आहेत. परीक्षा केंद्रावर मोबाईल कसा पोहोचला, चष्म्यातील कॅमेऱ्याचा वापर नेमका कसा करण्यात आला, प्रश्नपत्रिकेची माहिती कोणाला पाठवण्यात आली आणि त्याबदल्यात कोणाकडून उत्तरे मिळाली, या सर्व बाबींचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.

दरम्यान, संबंधित तीन उमेदवारांना परीक्षेत 90 पेक्षा अधिक गुण मिळाले असून त्यांची कनिष्ठ अभियंता पदासाठी निवड झाल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे त्यांच्या निकालाची आणि निवड प्रक्रियेचीही चौकशी होण्याची शक्यता आहे.

# अमरावती अग्निकांड: दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा; बावनकुळेंचा इशारा



**अमरावती :** अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात (SNCU) लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व असह्य आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून, अहवाल आल्यानंतर दोषी आढळणाऱ्यांवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा कडक इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. अमरावती व नंतर नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी रुग्णालयातील आग, फायर ऑडिटमधील त्रुटी, विरोधकांचे आरोप आणि वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसह विविध विषयांवर भूमिका स्पष्ट केली. रुग्णालयातील घटनेची माहिती देताना बावनकुळे म्हणाले, आग लागल्यानंतर रुग्णालयातील परिचारिका, सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांनी धावपळ करून ३६ बालकांना सुखरूप बाहेर काढले. त्यापैकी व्हेंटिलेटरवर असलेल्या बालकांची प्रकृती आता स्थिर असून ती नॉर्मल ऑक्सिजनवर आहेत. "घटना घडल्यापासून मी जिल्हाधिकारी व आरोग्य यंत्रणेशी सतत संपर्कात होतो. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी एम्स (AIIMS) मधील तज्ज्ञ, तंत्रज्ञ आणि अग्निशामक अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती तपास करत आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कोणीही दोषी आढळल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल." विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, "काही नेत्यांकडून रुग्णालयाचे 9 कोटी रुपये अडवून ठेवल्याचा खोटा प्रचार केला जात आहे. वस्तुस्थिती अशी आहे की 2024-25 मध्ये 2 कोटी 73 लाख आणि 2025-26 मध्ये 3 कोटी 76 लाख रुपये केवळ फायर सिस्टिमसाठी दिले गेले होते. मग तरीही फायर सिस्टीम का कार्यान्वित झाली नाही, याचीही चौकशी होईल." "या आर्थिक वर्षात डफरिन रुग्णालयाकडून जिल्हा नियोजन समितीकडे (DPDC) कोणताही निधी मागणीचा प्रस्ताव प्रलंबित नव्हता. रुग्णालयांमध्ये साधनसामग्री खरेदीतील दलाली रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती स्थापन केली आहे." रुग्णालयातील नवजात शिशु विभागाची एम्सच्या (AIIMS) मानकांनुसार अत्याधुनिक पद्धतीने पुनर्बांधणी केली जाईल आणि आवश्यक तो सर्व निधी दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ सप्टेंबर २०२६


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्बोधन शिबिर संपन्न

**जालना** : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नैतिक मूल्यांची जडणघडण होते, परस्परांवरील विश्वास वाढीला लागतो, कोणतेही कार्य एकत्र मिळून केले तर ते फलदायी होऊ शकते, अशाप्रकारे मानवी मनाच्या संवेदनात जपण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्याद्वारे होते. अलीकडच्या काळात परस्परांवरील विश्वास उडत चालला असून सामाजिक नाते विस्कळीत होत आहे, कोणताही समाज हा परस्परांवरील विश्वासावर अवलंबून असतो हा विश्वास दृढमूल करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होऊ शकतो. असा सूर उद्बोधन कार्यशाळेतून निघाला.नुकतेच बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. यावेळी जालना जिल्हा समन्वयक प्रा. विठ्ठल गाडेकर, प्रा. भरत धोत्रे, प्रा. रमेश वाघमारे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध कार्यपद्धतीबद्दल विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रास्ताविक प्रा. संदीप पाटील यांनी केले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, कार्यक्रमाधिकारी प्रा. ओमप्रकाश चव्हाण, प्रा. स्वाती पुरी, प्रा. अभिजीत भुतेकर यांच्यासह प्रा. प्रियदर्शन भवरे, प्रा. विलास भुतेकर प्रा. सुरेश कागणे, प्रा. संदेश जोशी आणि बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. कांचन कायंदे यांनी केले तर आभार रामेश्वर मस्के यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली

## रुपाली बेलसरे हीची प्रजासत्ताक पथसंचलन कॅंपसाठी निवड



**कन्नड (अरुण थोरात)** : शिवाजी महाविद्यालय कनड, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थिनी कु.रुपाली बेलसरे यांची 2026-27 या वर्षात होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन एन.आर.डी/ एस.आर.डी पथसंचलन कॅम्प डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर निवड झाली या तिचा यशा बद्दल प्राचार्य डॉ.विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ.राकेश अहरराव, डॉ. सोमा काशोद, डॉ. सोमेश मोगरे, डॉ. संतोष देशमुख, प्रा. प्रगती चव्हाण व स्वयंसेवक विद्यार्थी यांनी तिचे अभिनंदन केले.

## गेवराई जि. प. शाळेत पर्यावरणपूरक मूर्ती कार्यशाळा संपन्न



**पैठण** : परिषद उच्च प्राथमिक शाळा गेवराई बुद्रुक येथे 'पर्यावरण पूरक श्रीगणेश मूर्ती बनवा कार्यशाळा' घेण्यात आली. या कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून सरस्वती भुवन प्रशालेचे श्री. विजय पिंपळे सर व सेवानिवृत्त कलाशिक्षक श्री. दत्तात्रय बैरागी सर तसेच गायकवाड ग्लोबल स्कूल चे कलाशिक्षक श्री. अविनाश कांबळे सर यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीची गणपती मूर्ती तयार करणे सुरक्षित पर्यावरणासाठी अतिशय महत्वाचे कसे आहे, याबद्दलही मार्गदर्शन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथमच अशाप्रकारे शाडू माती पासून गणपती मूर्ती बनवण्याचा अनुभव घेतला. पाहुण्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि आनंदाने उत्तम अशा श्री गणपती मूर्ती तयार केल्या. जि. प. गेवराई बुद्रुक, कें. आडुळ या शाळेने श्री गणेशोत्सवाच्या निमित्ताने पर्यावरणाबाबत जागृती करण्याचा केलेला हा प्रयत्न स्तुत्य, अनुकरणीय असल्याचे उपस्थित पाहुण्यांनी सांगितले. उपक्रमाच्या आयोजनाबद्दल मुख्याध्यापक श्री. कालिदास रणनवरे आणि सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी श्री.गोपाळ बसपुरे, श्रीमती विद्या खैरनार, निकिता खरे, अनिता बाविस्कर, संगीता तळेगावकर, श्री. आशिष घोडके आदी शिक्षकांनी प्रयत्न केले. या आगळ्यावेगळ्या कार्यशाळेबद्दल पालकांनीही विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## गल्ले बोरगाव - तिसगाव रस्त्याची दुरवस्था; नागरिकांचा संताप



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : गल्ले बोरगाव ते तिसगाव या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, काही ठिकाणी रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे.या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच तिसगाव ,बोहळी तांडा,निरगुडी बु,खु ठाकरवाडी,पिंप्री,अजमपूर आदि गावांतील नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. गल्ले बोरगावात आठवडी बाजार भरतो मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनचालकांना वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्ट दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांसह इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्याच्या मधील तात्पुरते खड्डे वरच्या वर खडी आणखी मुरुम टाकुन बुजवण्याचे काम चालू आहे शासनाकडे डांबर संपले की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.गल्ले बोरगाव– तिसगाव मार्गाची तातडीने पाहणी करून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, असे परिसरातील नागरिकांनी सांगितले.








# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ सप्टेंबर २०२६

## दुष्काळाच्या संकटात शेतीपूरक जोडधंदेच बळीराजाचा खरा आधार!पावसाच्या लहरीपणावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे पर्यायी स्त्रोत उभारण्याची गरज



**धाराशिव (प्रतिनिधी) :** मराठवाड्यात पावसातील खंडामुळे खरीप पिकांसमोर पुन्हा संकट निर्माण झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातही पावसाअभावी सोयाबीन पिकाच्या वाढीवर परिणाम झाल्याची स्थिती यापूर्वीही दिसून आली आहे. या पार्श्वभूमीवर "दुष्काळाच्या संकटात शेतीपूरक जोडधंदेच बळीराजाचा खरा आधार" असा महत्त्वपूर्ण संदेश लेखक विश्वनाथअण्णा तोडकर यांनी दिला आहे.केवळ पावसावर आणि एका पिकावर अवलंबून राहण्याऐवजी शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, चारा उत्पादन आणि सेंद्रिय खतनिर्मिती यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांची जोड देणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.दूध व्यवसायातून नियमित उत्पन्नशेतीचे उत्पन्न वर्षातून एक-दोन वेळा मिळते; मात्र दुग्ध व्यवसायातून नियमित रोख उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे कुटुंबातील दैनंदिन खर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार तसेच जनावरांच्या चाऱ्याचा खर्च भागविण्यास मदत होते.शेळीपालन ठरू शकते आर्थिक आधारदुष्काळी परिस्थितीत तुलनेने कमी संसाधनांत शेळीपालन सुरू करता येते. योग्य जातीची निवड, लसीकरण, आहार व्यवस्थापन आणि बाजारपेठेचे नियोजन केल्यास शेळीपालनातून गरजेच्या वेळी चांगले उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे शेळीपालनाला "शेतकऱ्यांचे फिरते एटीएम" असे संबोधले जाते.कुक्कुटपालनातून रोजच्या खर्चाला हातभारगावरान किंवा निमगावरान कुक्कुटपालन हा ग्रामीण कुटुंबांसाठी विशेषतः महिलांसाठी उपयुक्त पूरक व्यवसाय ठरू शकतो. अंडी आणि कोंबड्यांची स्थानिक बाजारपेठेत विक्री करून नियमित उत्पन्नाचा स्रोत निर्माण करता येतो.शेती आणि पशुपालनाची सांगड आवश्यकज्वारीचा कडबा, सोयाबीनचे कुटार, हरभऱ्याचे भुस्कट आणि मक्याचे अवशेष यांचा चाऱ्यासाठी योग्य वापर करता येतो. त्याचबरोबर जनावरांपासून मिळणारे शेणखत शेतीमध्ये वापरल्यास शेती आणि पशुपालन यांच्यातील नैसर्गिक चक्र पुन्हा मजबूत होऊ शकते.एकाच पिकावरील अवलंबित्व धोकादायकधाराशिवसह मराठवाड्यात सोयाबीनचे मोठे क्षेत्र आहे. मात्र पावसाने ओढ दिल्यास एकाच पिकावर अवलंबून असलेल्या शेतकरी कुटुंबाच्या अर्थकारणावर मोठा परिणाम होतो. त्यामुळे परिस्थितीनुसार ज्वारी, तूर, हरभरा, करडई, भुईमूग यांसारख्या पिकांसोबत चारा पिकांचेही नियोजन करणे आवश्यक आहे.प्रशिक्षण, बाजारपेठ आणि थेट विक्रीवर भरजोडधंदा सुरू करण्यापूर्वी त्याचे प्रशिक्षण, खर्च, बाजारपेठ आणि अपेक्षित उत्पन्न यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.आज मोबाईल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांशी थेट संपर्क साधता येतो. त्यामुळे दूध, अंडी, कोंबड्या, शेळ्या तसेच सेंद्रिय खत यांची थेट बाजारपेठ निर्माण करण्यावर शेतकऱ्यांनी भर द्यावा, असेही तोडकर यांनी सांगितले."दुष्काळाशी लढायचे असेल तर शेतीची रचना बदलावी लागेल""पाऊस आपल्या हातात नाही आणि बाजारभावही आपल्या नियंत्रणात नाही. त्यामुळे शेतकरी कुटुंबाच्या हातात पर्यायी उत्पन्नाचे साधन असणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीला पशुपालन, चारा, कुक्कुटपालन आणि थेट बाजारपेठेची जोड देऊन आर्थिक स्वावलंबन वाढवले पाहिजे," असे विश्वनाथअण्णा तोडकर यांनी स्पष्ट केले."निसर्ग आपल्याला थांबवू शकतो; पण आपण थांबण्याची गरज नाही. दुष्काळाशी लढण्यासाठी शेतीची रचना बदलणे आणि प्रत्येक शेतकरी कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे ही काळाची गरज आहे," असा संदेश त्यांनी दिला.

## पर्यटनस्थळी वन्यजीवांना अन्नपदार्थ खाऊ घालणे ठरतेय धोकेदायक



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील पितळखोरे, कालीमठ, किल्ले अंतूर, औट्रमघाट, नागदघाट, गौताळा यासह अजिंठा सातमाळ डोंगर रांगेतील पाटणादेवी, अजिंठा, वेरूळ लेणी, दौलताबाद, म्हैसमाळ, सारोळा आदी पर्यटनस्थळी पावसाळी पर्यटनासाठी सध्या मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. या पर्यटन स्थळी बहुतांश पर्यटक आपल्या सोबत चिप्स- कुरकुरे, चिवडा, खारवलेले शेंगदाणे, वाटाणे, भजे, ब्रेड पकोडे, भाकरी, व तत्सम प्रक्रिया केलेले सुटे व पाकीटबंद मानवी अन्नपदार्थ सोबत आणतात. व हौसेने जमिनीवर फेकतात. येथील माकड, खार, बुलबुल, सात भाई, मैना, दयाळ, कावळे आदी वन्यजीव खाण्यासाठी त्यावर तुटून पडतात. हा अनुभव बऱ्याच पर्यटन स्थळी नित्याचाच झाला आहे. सदर प्रक्रिया केलेले तेलकट, खारट व रासायनिक प्रिझर्वेटिव्ह असलेले पाकीट बंद व इतर अन्नपदार्थ हे या वन्यजीवांचं नैसर्गिक खाद्य नसून ते त्यांच्या जीवितांस हानिकारक असल्याने त्याबाबत सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व वन्यजीव संवर्धक डॉ.संतोष पाटील हे यावर अध्ययन करत आहेत. सातत्याने पर्यटन स्थळी जनजागृती करत आहेत. पाच वर्षांपूर्वी सह्याद्रीची उपरांग असलेल्या अजिंठा डोंगरात तोंडापूर लगत दोन माकडांना गुरुद्वाराचा व अन्ननलिकेचा कर्करोग झाल्याचे त्यांनी प्रकाश झोतात आणले होते. त्या मागचे कारण ही प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ माकडांना खाऊ घालणे हे होते. प्रक्रिया केलेले, शिजवलेले, तळलेले अन्नपदार्थ पक्षांसाठी का आहेत हानिकारक आहेत. 1) या प्रकारच्या अन्नपदार्थांमध्ये मिठाचे म्हणजेच सोडियमचे प्रमाण अत्याधिक असते, त्याचे सेवन पक्षांनी केल्यास त्यांच्या शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होऊन डिहायड्रेशनची अवस्था उद्भवते व त्यामुळे त्यांचे मूत्रपिंड निकामी होऊन अकाली मृत्यू येण्याची शक्यता बळावते.2) तळलेले तेलकट पदार्थ पक्षी व इतर वन्यजीवांनी सतत खाल्ल्यास त्यांचे वजन अवास्तव वाढते व त्यांची उडण्याची क्षमता कमी होऊ शकते. जास्त तेलकट पदार्थ खाल्ल्याने पक्षी व इतर वन्यजीवांच्या लिव्हर ( यकृत) मध्ये चरबीचे प्रमाण अत्याधिक ( फॅटी लिव्हर)होते. ज्यामुळे त्यांचे आयुष्य धोक्यात येते.3) बुलबुल, मैना ,स्वर्गीय नर्तक या सारखे पक्षी हवेत उडणारे कीटक पकडण्यास निष्णात असतात. मात्र अशा प्रकारे आयते अनैसर्गिक खाद्य मिळाल्यास हे पक्षी आपली शिकार शैली विसरतात. कीटक भक्षी असणारे पक्षी निसर्गामध्ये नैसर्गिक कीड नियंत्रण करण्यास मदत करतात मात्र जर आपण त्यांना असे आळशी बनवले तर ही क्रिया विस्कळीत होईल. 4) सतत तेलकट खाद्यपदार्थांचा संपर्क या पक्षांच्या पिसांशी आल्यास त्यांची पिसे अधिक तेलकट होतात. व त्या पिसांवरील नैसर्गिक संरक्षक प्रिन ग्लँड शिल्ड हे आवरण नष्ट होते.5) खाद्यपदार्थ खाण्यासाठी एकाच जागी विविध प्रजातीचे पक्षी खूप मोठ्या संख्येने गर्दी करतात. त्यात कबुतरांचा भरणा ही मोठा असतो. अशा या गॅदरिंग मुळे "एव्हीएन बर्ड फ्लू व्हायरस" या विषाणूंचा संसर्ग -प्रादुर्भाव इतर पक्षांना होतो व हा आजार पक्षांसाठी प्राणघातक ठरतो. 6) पर्यटन स्थळी जिथे अशा प्रकारे पक्षांचा मेळावा जमतो. त्या ठिकाणी त्यांची मोठ्या प्रमाणात विष्ठा पडून मानवासही काही आरोग्य विषयक समस्या उद्भवतात. 7) खार आणि पक्षी असे खाद्य खाण्यास माणसांच्या जवळ जातात व बरीच पर्यटक हे पक्षी पकडून पिंजऱ्यात पण ठेवतात. किंवा खाण्यासाठी वापरतात.

8) असे खाद्यपदार्थ खाल्ल्याने पक्षांची पोट तर भरते मात्र सकस आहार न मिळाल्यामुळे त्यांना कुपोषणाच्या समस्या उद्भवतात.या कडे वन्यजीव, निसर्गप्रेमी, वन्यजीव विभागाने लक्ष देऊन प्रबोधन, प्रसंगी कारवाई करणे गरजेचे आहे.

## पान घोडा

अगडबंब पान घोडा
दिवसा राहतो पाण्यात
भूक लागली की रात्रीला
खाद्य शोधतो वनात

तपकिरी गर्द रंगाचा
बेढब कुरूप दिसतो
भूक त्याला लागली की
मोठा जबडा वासतो

स्वभावाने तसा शांत
पाण्यात सदा राहतो
खोड्या त्याला केल्या की
आक्रमक लगेच होतो

शरीरातून लालसर द्रव
नैसर्गिकरीत्या बाहेर पडतो
त्वचेचे रक्षण करण्यासाठी
त्याचा उपयोग होतो

पाण्यात डुबकी मारून
मस्तीत येऊन खेळतो
छोट्या छोट्या डोळ्यांनी
सभोवताल न्याहाळतो



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## नको बेगडी उपकार

बांधू नकोस धाग्याने,
मी मोकळाच बरा आहे.
माणुसकीच्या ममतेने,
सर्व नात्यांचा भार वाहे. १

बांधून धाग्याने मला,
असे कैद करू नकोस.
नाते माझे जिवाभावाचे,
बंधनात अडकवू नकोस. २

धाग्यात बांधल्याने कुठे,
हृदयातले प्रेम वाढते.
धाग्यात बांधून मनाला,
कशाला उगी छेड काढते. ३

रेशीम धाग्याने कुठे कधी,
मनात प्रेम वाढत असते.
मनाने मनास ओळखावे,
याला कुठले बंधन नसते. ४

नको बेगडी उपकार मला,
मनातून नात्यांना वाहिले.
रेशमी धागा बांधणारेच,
कट रचताना मी पाहिले. ५

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ सप्टेंबर २०२६

# ‘संथ थंड संगाशी संग’बद्दल - डॉ. सुधीर रा. देवरे

‘संथ थंड संगाशी संग’ हा माझा सहावा कवितासंग्रह ‘शब्दालय प्रकाशना’ने जून २०२६ ला प्रकाशित केला, त्याबद्दल...

‘आदिम तालनं संगीत’ (अहिराणी), ‘डंख व्यालेलं अवकाश’, फुटूच लागतात पंख’, ‘भंग अभंग’, ‘पाय नसलेली माणसं’ आणि आताचा ‘संथ थंड संगाशी संग’ (मराठी) असे सहा कवितासंग्रह प्रकाशित. सध्याचा काळ हा प्रत्येकासाठी कठीण, सतत अस्वस्थ ठेवणारा आहे. जे विचार करत नाहीत, जे चिंतन करत नाहीत, जे आपल्यातच रममाण आहेत, ज्यांना समस्याच भेडसावत नाहीत, ज्यांना आतून समष्टीत उत्स्फुर्त असे काही येत नाही, ज्यांना सार्वजनिक व्यक्त व्हावेसे वाटत नाही, ते सर्व भाग्यशाली. आपले संपूर्णत्व, अपूर्णत्व, बांधिलकी, असणे, नसणे, सत्तेचा फास, व्यवस्था, देश, देव, धर्म, भाषा, प्रांत यातून ज्यांचे आत्मचरित्र घडत नाही ते सर्व सुदैवी लोक आहेत. ह्या संग्रहातल्या कवितांत घुसमटलेली मानवी मनस्थिती दिसेल. आजच्या काळात साहित्यिकांची भूमिका महत्वाची आहे. ती प्रत्येक सारस्वतात दिसायला हवी.

कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत रवींद्र लाखे म्हणतात, ‘कवी सुधीर देवरे हा प्लान्ड म्हणजे सुरचितपणे जगणारा कवी नाहीये. तो जागच्या जागी ठाम कवी आहे. त्याची मूर्ती उचलून तिची प्रतिष्ठापना कुणी हव्या त्या ठिकाणी करू शकत नाही. एका कवितेत राणी माशीचा उल्लेख आहे. समष्टीच्या दृष्टीकोनातून पाहिलं की राणी माशी ही एक सत्ताच असते. एखादी अस्मिताही राणी माशी वाटावी अशा या जमान्यात तिला कवितेतून ओळखणं हे विलक्षण आहे... ही कविता दुसऱ्या कुणाच्या किंवा मराठी कवितेशी स्पर्धा करायला निघालेली नाही किंवा देवरेंना आपल्या कवितेचं मराठी कवितेतील स्थान पक्क वगैरे करायचं नाहीये. मनाच्या संरचनेशी कवितेनं अनुनाद साधला पाहिजे अशा धारणेचे हे कवी आहेत. स्वत:शी प्रामाणिक राहण्याचा यशस्वी प्रयत्न म्हणजे हा कवितासंग्रह... यातल्या प्रत्येक कवितेवर स्वतंत्र भाष्य करता येईल इतक्या त्या मौलिक आहेत... स्वतःच्या जगण्याशी जुळवून घेत असतांना, स्वत:शी प्रामाणिक राहणं कठीण जायला लागलं की कवितेचं बीज मनात निर्माण होतं. ‘संथ थंड संगाशी संग’ हा कवितासंग्रह अशाच एका पोकळीत बीजरूप जन्माला आलेला आहे... हा संग्रह म्हणजे हळूहळू, वर्षानुवर्षे साचत गेलेल्या अनुभवांचा गाळ आहे. बाह्य आयुष्य चालू असतानाही आत कुठंतरी ठप्पपणाची भावना राहणं; बोलण्यातून, कृतीतून निभावून नेलेलं आयुष्य आणि मनात चाललेला वेगळाच संवाद, या दुभंगातून कवीचा मानसिक प्रवास सुरू होतो. या कविता त्या दुभंगाच्या नोंदी आहेत... शरीर आणि मन यांच्यातला ताण हा या प्रवासाचा दुसरा स्तर आहे आणि तो अधिक मूक आहे. कवीच्या जाणिवेत एक टप्पा असा येतो, जिथं हे स्पष्ट होतं की मानसिक स्थिती ही केवळ विचारांची नसते, ती देहातही उतरते. काही कविता या समजुतीतून येतात, जिथं वेदना व्यक्त होत नाहीत, पण स्वीकारल्या जातात... आत्मिक पातळीवर हा संग्रह आतल्या आत स्वत:शीच चाललेल्या संघर्षातून स्वतःचाच स्वीकार झालेल्याची नोंद आहे. पण इथं स्वीकार म्हणजे शरणागती नाही. तो एक प्रगल्भ निर्णय आहे... या स्वीकारातूनच ‘थंड’पणा येतो, भावनांपासून दूर न जाता भावनांमध्ये न अडकण्याचा... ‘संगाशी संग’ हा या संग्रहाचा केंद्रबिंदू आहे. या शब्दसमूहात आधार, सोबत किंवा आश्रय यांचा आग्रह नाही. इथं संग म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाशी चालण्याची तयारी. स्वतःपासून पळण्याऐवजी स्वत:शी थांबण्याचं धैर्य... या कवितांमध्ये अध्यात्मिक घोष नाहीत, तत्त्वज्ञानाचे संदर्भ थेट दिलेले नाहीत. तरीही या संग्रहाचा स्वभाव गाभ्यानं तत्त्वज्ञानात्मक आहे, कारण तो ‘कसं जगावं?’ याचं उत्तर देत नाही, तर ‘जगणं सहनशील कसं बनतं?’ हा प्रश्न उघडा ठेवतो. इथं कविता ही साधन नाही; ती एक अवस्था आहे, मनाच्या आणि आत्म्याच्या मधली... आजच्या मराठी कवितेच्या संदर्भात पाहिलं तर ‘संथ थंड संगाशी संग’ हा संग्रह कोणत्याही ठळक प्रवाहात स्वतःला बसवण्याचा प्रयत्न करत नाही, तर जाणीवपूर्वक कमी बोलणारी भूमिका घेतो... संकोच, थांबा आणि अंतर्मुखता यांचं साहित्यिक महत्त्व अधोरेखित करतो... आतल्या वास्तवाला कवितेचं क्षेत्र मानतो. तो अनुभव इतक्या प्रामाणिकपणे मांडतो की वाचकाला स्वतःचं प्रतिबिंब दिसू लागतं... या अर्थानं या कविता आजच्या मराठी कवितेत एक वेगळी, पण आवश्यक जागा घेतात, जिथं कविता पुन्हा एकदा मन:स्थिती बनते, विधान नाही; प्रक्रिया बनते, निष्कर्ष नाही... आरशासारख्या तर काही शांत सावलीसारख्या या कविता आहेत... हा कवितासंग्रह लेखकाच्या मानसिक-आत्मिक प्रवासाचा दस्तऐवज नाही; तो त्या प्रवासात निर्माण झालेलं मौन आहे... या कवितेतला बोलकेपणा या कवितासंग्रहाला दिलेल्या शीर्षकासारखा आहे. “संथ थंड संगाशी संग”. यात असंगाशी संग हा ध्वनी जास्त जोरात बोलतो. यातला संथ हा शब्द आहे तो अती वेगात दिसणाऱ्या स्तब्धतेशी आहे. भवताल स्वत:त इतका रमला आहे की तो प्रतिसाद देत नाही, त्या अर्थानं त्याचा संग थंड आहे. असे शब्दांच्या बाहेर नेणारे ध्वनी संग्रहभर सापडतात.’ (अतिसंक्षिप्त).

या कवितेबद्दल सायमन मार्टिन म्हणतात, ‘बोलीभाषा आणि लोकसाहित्याच्या अभ्यास- संशोधनामुळं देवरे यांची स्वतःची भूमिका तयार झालेली आहे, तीच स्पष्ट, परखड मानवतावादी भूमिका ते आपल्या लेखनातून आणि समाज माध्यमांवरील प्रतिक्रियांमधून सतत निर्भिडपणे मांडत असतात. साहित्यिकाला भूमिका असावी असं त्यांचं म्हणणं आहे. आजच्या काळाला त्यांनी दिलेला प्रतिसाद म्हणजे या कविता आहेत... या संग्रहातील कविता समग्र मानवाशी संपर्क साधू इच्छिते. ती निसर्ग आणि विश्वाला कवेत घेते. आपण ज्या भवतालात जगत आहोत त्यातील जाणिवांचा वेध घेत ही कविता येते. भौगोलिकतेच्या सर्व सीमा, तसेच धर्म, भाषा, वंश आणि आजचा टोकाचा राष्ट्रवाद या सर्व विचारधारा ओलांडून ही कविता पुढं जाते. म्हणून अशा कवितेचा आपण ध्यास आणि वेध घेतला पाहिजे. कवितेचा मुख्य उद्देश मानवसमूहाला एकत्र करणं हाच असला पाहिजे. त्या अर्थानं कवितेनं आपल्या सांप्रत काळाबद्दल बोललं पाहिजे. तत्कालीन परिस्थितीबद्दल स्पष्ट विधान केलं पाहिजे. चिरंतन मूल्यांचा पाठपुरावा केला पाहिजे... आजच्या भोगवादाचं जळजळीत वास्तव मांडणारी ही कविता आहे. कविता हा असा उद्गार आहे जो आम्हाला माणूसपणाची दीक्षा देतो. आमच्या कवितेनं काळाला प्रतिसाद द्यावा. उत्तम कविता कायम हस्तक्षेप करीत असते. आजच्या अस्वस्थ वर्तमानाला शब्दांकित करण्यासाठी नवीन भाषा आणि नवीन शब्दप्रयोगाची आवश्यकता आहे. जुनी प्रतिकं आणि प्रतिमातून बाहेर पडून या काळाला उत्तर देईल अशा भाषेची गरज आहे. ती गरज या संग्रहातून पूर्ण झालेली पाहायला मिळते. या कवितेत कवी आपल्या काळाची साक्ष देतो. ज्या कवितेत सर्व प्रकारच्या कुरूपतेबद्दल विधान केलेलं असतं आणि परिस्थितीचं स्पष्ट दर्शन घडवतं, ती उत्तम कविता. म्हणून ही कविता उत्तम आहे... कवीनं सत्तेच्या वाऱ्याला उभं राहू नये. ज्यांनी सत्याचा बाजार मांडलेला आहे, अशा असत्याला आव्हान देण्याचं काम कवितेला करायचं आहे... जंगल नष्ट होणं, बाग उध्वस्त होणं, पक्षी, प्राणी, पर्यावरण संपून जाणं आणि माणूसपणाचा ऱ्हास होण्याच्या काळात कविता हा एकमेव सर्वकाही पुनर्स्थापित करण्याचा मार्ग असतो. देवरे यांच्यासारखे कवी तो मार्ग चोखाळत आहेत... वैयक्तिक दु:ख आणि वेदनेला कवटाळून न बसता एका सुंदर जगाचं स्वप्न पाहणारी कविता घेऊन येत आहेत, म्हणून सुधीर देवरे यांच्या कवितांचं स्वागत.’ (अतिसंक्षिप्त). ब्लर्बवर (पाठराखण) शरणकुमार लिंबाळे या कवितेविषयी म्हणतात, ‘संथ थंड संगाशी संग’ ह्या कवितासंग्रहात सुधीर देवरे यांनी ठरवून भूमिका घेतल्याचे दिसते. त्यांची ही भूमिका मानवधर्माची पाठराखण करणारी असून आगळ्या वेगळ्या संवेदनशीलतेने चित्रमय दृश्यात ती आविष्कृत होते... समकालीन उलथापालथीच्या काळात विचारी माणसाची वाढत जाणारी अस्वस्थता, सामाजिक, राजकीय चिंतन, मानवीय समष्टी समस्यांतून भूमिकांची उत्स्फुर्तता, अभिव्यक्तीतील सार्वजनिकपण, संपूर्णत्व की अपूर्णत्व, सामाजिक बांधिलकीतील असणे- नसणे, सत्तेची नशा, देश, देव, धर्म, व्यवस्था, प्रांत, भाषा यातून कवीचे आत्मचरित्र घडत जाते की बिघडत जाते. अशा सर्वांगिण भूमिका घेत व्यवस्थेच्या भोवाड्यात नेमके कोणते सोंग कसे वठवावे- नाचवावे, हा प्रश्न संग्रहभर अगम्य संगीतात आत्मनिष्ठतेतून समष्टीत निनादत राहतो. सुधीर देवरे यांच्या कविता वाचकाच्या मनन- चिंतनाचा विषय होत कालातीत महाकाव्यासारख्या सलगपणे सर्वदूर कायम वाचल्या जातील!’

या संग्रहातील ३ कविता (निवडून नव्हे) मुद्दाम रसिकांसाठी देत आहे :तळघरातला कलशमाझ्यास्वर्गाचीवाटतुझ्यागाभाऱ्यातून जाते...आता तरीउघड दारकुष्टाळ्यातलाअभिषेक संपण्याआधी...तुलाही सहजप्रसन्न होईलहातोहात साक्षातकिल्लीतला स्वर्ग,माझ्या तळघरातलाकलशशुचिर्भूत होता होता...*वाजत असतं आतही...

ढग वितळतानाआपण काहीच करत नाही,अहर्निश भोगत असतो पाऊस,ज्ञानेंद्रियेही बुडून जातातजलधारांच्या मिठीत, तरी दिवस वाया जात नाही...कारण पाऊस म्हणजेकविताच असते, मनात असो, काळजात असो वा मेंदूत,पाऊस घराबाहेरच कोसळतो असं नाही...‘आदिम तालनं संगीत’अविरतवाजत असतं आतही...*निखळ आनंद परस्पर कुठला पुरस्कार जाहीर होत नाही म्हणून निखळ आनंद होत नाही. परस्पर विद्यापीठात अभ्यासक्रमात लागत नाही म्हणून निखळ आनंद होत नाही. प्रथितयश सार्वजनिक भलावण करत नाही (खाजगीत करतो तशी) परस्पर प्रसिध्दी धाऊन येत नाही (भाषणांसाठी खंडीभर निमंत्रणं, पण शब्दांच्या चोथांचा उपयोग काय?) आयुष्यभर फक्त अस्वस्थ होत रहायचं भोगलेलं लिहीत बसायचं... वेदना सोसत कन्हायचं... कधीतरी कोणीतरी वजनरहीत वाचकानं वाचल्याचं कळवलं की निखळ आनंदात रमायचं!*‘संथ थंड संगाशी संग’ (कवितासंग्रह)सुधीर राजाराम देवरेशब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.पृ. संख्या, १८२,

**किंमत : ३२५ रूपये.**

**(इतरत्र प्रकाशित करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती. ‘संथ थंड संगाशी संग’ कवितासंग्रहाच्या मागणीसाठी- शब्दालय प्रकाशन, मोबाईल : 9822525444)©**

**डॉ. सुधीर राजाराम देवरेब्लॉगचा http://sudhirdeore29.blogspot.com/**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ सप्टेंबर २०२६


# सत्तांध - समकालीन वास्तवाची मर्मग्राही कविता




कवी कथाकार कादंबरीकार बालसाहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांचा सत्तांध हा कवितासंग्रह म्हणजे आजच्या वास्तवाचे मर्मग्राही भाष्य आहे.सत्तेत मश्गूल असलेले राजकीय नेते सर्व सामान्य जनतेला सत्तेसाठी फक्त मतदानपुर्ता वापर करून घेतात.तो नेता सत्ता आल्यानंतर आंधळा होतो.त्याला जनतेचा टाहो ऐकू येत नाही.आपल्या राजकीय सत्तेने उन्मत्त होऊन सर्वहरा जनतेची तो फक्त खेळी करतो.जनतेचा आवाज बंद केला की,'तो हम करे सो कायदा.व स्वार्थाचा फायदा' जनता बिचारी पोरकी होऊन फक्त नेत्यांनी विकासाची,मदतीची पाच वर्षे वाट पाहते.इकडे त्याच्या जगण्याची वाट लागलेली असते.मग यात शेतकरी शेतमजूर कामगार गोरगरीबांची कष्टकरीची होरपळ होते.नेमका हाच मनाचा धारदार निर्धार करुन कवी सचिन बेंडभर पाटील यांनी या सत्तांध कवितेतून शब्दांगार व्यक्त केला आहे.जसे"न्याय नीतीची नसते चाड,अशीच त्यांची घरं भरली आजा, मुलगा,नातू पणतू, सत्ता त्यांच्याच घरात जिरली॥उभा डोंगर सरकारी मालकी, त्याला त्यांनी सपाट केले.ज्याच्या हाती सत्ता त्यांचे,उभे तेथे बंगले॥"(पृ.१५)हीप्रखड सत्यनिष्ठ काव्याची अभिव्यक्ती म्हणजे निर्भीड मनाची शब्दतळ ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक व्यक्त करते.'भरारी' या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे आजच्या सर्वहरा समाजाच्या उन्नतीसाठी ती भाष्य करते.तू कधीचं खचून जाऊ नकोस,कारण नराचा नारायण करण्याची हिंमत तुझ्यात आहे.हिंमतीने तू लढले पाहिजेस.कोणतीही गोष्ट अशक्य नाही.कारण तू या छत्रपतींच्या भूमीचा भूमीपुत्र आहेस."आठव छत्रपतींना, शौर्य, धैर्य बाणा.त्याच मातीतला तू,त्यांचा माळवा ना?"(पृ.१६)ही कविता मनाच्या समृद्ध सकारात्मक विचारधारेची असल्याने ती ओंजळभर शब्दफुले तर देऊन जातेच पण मनाचा निर्धार ही जागृत करते.धरणात जमीन गेली, घरदार बुडालं ही वेदना येते तेव्हा कवी धीर धर स्वतःवर विश्वास ठेवं तुझं चांगलेचं होणार आहे.'हसतं जगावे' अनेक संकटं येतील,चटके बसतील,घरटे तुटून जाईल, जिद्द आणि चिकाटी मनात जपत जा.म्हणून "विचार आपले दुःखाचे मुळ.हसतं जगावे चिंता सोडून, कर्तृत्वाला दाही दिशा मग,का रडावे नशिबाआडून"(पृ.१८)ही मानवी प्रवृत्ती बदलली पाहिजे.'वटवृक्ष'असंख्य फांद्या घेऊन जगतो.तो मोठा वृक्ष असतो.पण त्याच्या फांद्या तुटतातचं.म्हणून माणूस कितीही मोठा झाला त्याचा अंत ठरलेला.तशी प्रत्येकाची सांज ठरलेली.या कविचा अंतरंग हा नेत्याचा आहे.नेता भारी लंब्या चौड्या बाता.या युक्ती प्रमाणे भारतीय लोकशाहीत जो केवळ आश्वासने देतो तोच मोठा होतो.पण "जनतेस सत्य कळले तरी, सत्तेपुढे शहाणपण नसतंय.म्हणूनच आता दिवसा उजेडी.कुंपणच रोज शेत खातंय"(पृ.२२)ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक मांडते.शेतकरी, शेतमजूर कामगार गोरगरीबांचे 'सुखाचे दिवस' नेत्याला निवडून दिल्यावर पुन्हा नेत्यांपुढे लाचार होऊन पुन्हा झुकावे लागते ही खंत तर आहेच "सत्ता हाती ते मुजोर नेते, पुन्हा -पुन्हाही तेच मंत्री. जातीजातींत आम्ही भांडतो.जणू नेत्यांच्या बाहुल्या कळसुत्री"(पृ.२३)ही भक्कम धारधार पाते घेऊन येणारी कविता सचिन बेंडभर पाटील यांनी मांडली आहे.या लोकशाहीत शेतकरी, कामगारांची मुले आमदार होतील का?या लोकशाहीला सुखाचे दिवस येतील ही आशा या कवितेतून आली आहे.ही 'वेदना'मुखर करतांना कोणता झेंडा घेऊ हाती? त्यांनी माझेच हात कापले ही खंत तर आहेच.कारण या चेहऱ्या मागे अनेक चेहरे.फक्त काळजावर दगड ठेवून जगायचे अशी वेदना ही कविता देते.आज आपल्या गाव शिवाराची माणसं ही लाचार झाली आहे पैशापुढे आपल्या नितीमत्तेला ते विकत आहेत.'सरपंच झाला' या कवितेचा मर्मग्राही अनुबंध असा "जातगोत अन् भाऊबंदकी,माणसात माणूस नाही ठेवला.विरोधकांना पुरुन उरण्या,आमचा तुका सरपंच झाला"(पृ.२६)सारेच नी सगळेच खंगाळून डखाळून या राजकीय व्यवस्थेचे प्यादे होतं आहे.'पैसा' व राजसत्ता यांची यांच्या मागे लागल्याने केवळ सत्तांध होऊन.इथेलोकशाहीचं नागडी करता आहेत.'राजकारणी नेता' या कवितेचा आत्मा असा विरोधकावर सतत अर्वाच्य भाषेत बोलत राहायचे.जनेताचा उन्नतीचा वसा घेतला आहे असे भासवायचे.कवीने मनोज्ञ भावने दर्शन घडविले आहे ते असे "वाटतं नेहमी,आपला नेता,सुविद्य व सुसंस्कृत असावा.राजकारण पारदर्शक अन्, जनसेवेचा ध्यास असावा"(पृ.२८) आमचा देश महान आहे.महासत्ता होऊ पहातो आहे पण आमच्या जीवनाची परवड चालूच आहे.दिवाळी नाहीच पण दिवाळमात्र निघालं आहे.आमच्या देशात भिकारी नव्या मताचे दान मागतो आहे.म्हणून 'आई म्हणायची' नातीगोती अन् सारा समाज, स्वार्थविना जपायचा असतो.सुख-दुखाच्या उन-सावलीत.नेहमी तोच तर कामास येतो."(पृ.३३)ही सविनय शिकवण आहे.'जपायला हवं, उद्यासाठी 'मनातलं मायाळू स्नेहाळू गहिवरलेपण जपा.'मंत्र नवा'आपण नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय राजकारण केलं पाहिजे.केवळ सत्तांध होऊन.जगू नका.आम्ही नेते महान केले.गोरगरीबांचा तळतळाट घेऊन ही नेते क्षणिक मोठें होतील पण ती समाधानी जगू शकत नाही.'कर्म' या कवितेने"म्हणून म्हणतो सावध हो! सत्याचा मार्ग धर,शेवट मात्र गोड व्हावा, जीवनात असंच कर्म कर"(पृ.३७) आपल्या सृजनशील भावनेचा ओंजळभर ओलावा ही कविता देऊन जाते.'श्रमदानाचा महामंत्र,देत देशप्रेम भावनेची मागणी ही कविता करते.'आनंदाचे जीणे जगण्यासाठी,लेक,ही अगाध पुण्याची लकेर आहे.तर आई हृदयस्पर्शी हुंकार आहे.म्हणून या जगण्यावर'जाता जाता हसता यावे'हे मायाळू नाते आपणास जपता आले पाहिजे.'गाव'तिथे माणुसकीचा झरा आहे.'माणूस जातं'चिमणीची मनोज्ञ भावना इथे येते.आयुष्य व माणूस चांदरात व प्रवास, करताना एक निस्सीम प्रेम भक्तीची परिपूर्णता 'तोच महान होतो'अनेक संकटे काटेरी मुकुट घालून आले तरी धिरोदत्त सामोरे जावे तोच महान.सत्य असत्य, आनंदाचे माहेर, प्राजक्त, नातं, ध्येयवेडे, कर्माचा खेळ,देवदेतो देण्यासाठी, आधारकाठी या कवितेने समकालीन व्यापकता मांडली आहे.'कसा धरावा भरोसा?व 'निवडणूक आली असंल' या समकालीन राजकीय वर्तमानाची अस्वस्थ वेदनीची बेइमानी उघड करणाऱ्या कविता आहेत."निसर्गाच्या लहरीसवे, व्यवस्थाही टाकी फासा.खरं सांगा कोणावर,कसा धरावा भरोसा"(पृ.६३)"हयातभर हेच ऐकतोय,पण मी कसा फसलं.हुरळून जाऊ नको पोरा, निवडणूक आली असंल"(पृ.६२)सचिन बेंडभर एक निस्सीम लेखणीचा निर्धारक हात आहे.या कवितेचा मर्मग्राही आस्वादक स्वानुभव तुमचा आमचा आहे म्हणून ही कविता अस्सल सल मांडते.'सलराहुन गेले जगणे, मित्र, स्वर्ग सुख,बाई, एकला, संवाद मनामनाचा,शकुनी फासे,या कवीच्या स्व अनुभव मांडतात.आयुष्य,असे कसे दिवस आले,ही सखेद भेदक वेदना मांडणारी कविता.गावात शहराळलेपण आलं,नारी शक्ती चा सन्मान करा,सगळतर ठिक चाललंय, परिवार, आईपण, रक्तदान, इरसालवाडी,आयुष्य, तरुण, जीवनप्रवास,नशा,ती,या कवितेने समकालीन व्यापकता मांडली आहे.नोकरी,कैरी, अपयश यशाची पहिली पायरी,या मातीसाठी एवढं कर,ही सतांध सत्तेची कुरघोडी करणारी कविता अशी "म्हणून म्हणतो भ्रष्टाचार गाड,लाचमागताच हात उगार, आईच्या दुधाची शपथ तुला.या मातीसाठी एवढं कर"(पृ.९२)ही सविनय धारधार निर्धाराचे पाते घेऊन निघलेली ही कविता आहे.'राजकारण गेलं चुलीत' घे शब्दशस्त्रांचे हातात कोलीत म्हणून ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल विद्रोह करीत आली आहे."गुंडगिरी अन् पैशापुढं, समाजमन मुर्दाड झालं.मनापासून मग ठरवलं, राजकारण चुलीत गेलं"(पृ.९४)'भंगार,भंगार तुच आधार,दुखाचे कारण तू निराधार'अशी वेदनेची फुंकर घालीत ही कविता निघाली आहे.ख्यातनाम समीक्षक ८९वे अ भा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रेदय डॉ श्रीपाल सबनीस यांची प्रस्तावना अशी"सचिन बेंडभर यांची कविता माणसांच्या सुखदुःखाची, संघर्षाची,व समाधानाची वाहक आहे.या कवितेने विश्वशांती व कल्याणाचे स्वप्न उरी बाळगले.गरीबाचा कैवार घेतला.स्त्री जातीचा सन्मान केला.देशप्रेम व मानवताप्रेमात बुडाली ही सत्यनिष्ठ विवेकी कविता मराठी वाड्मयाची भूषण ठरते"(पृ.९)कवीचे मनोगत तितकेच मर्मबंधी आहे ते असे "शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कुणालाच बोलावं वाटत नाही.भोंदुगिरीचा बुरखा फाडावा वाटतं नाही.समाजातील संवेदनशीलता संपली की काय?असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे.म्हणून या कवितेचा खटाटोप या कविता वाचून तुम्हाला अन्याय विरुद्ध चीड नक्कीच जाणवेल त्या विद्रोहाची एक ठिणगी म्हणून एक दिवस नक्की क्रांती होईल,अशी आशा वाटते"(पृ.१०) अर्पण पत्रिका बालसाहित्यिक डॉ विनोद पांडुरंग सिनकर या स्नेहाळू सन्मित्रास व सौ प्रज्ञा विनोद सिनकर यांना आहे.तर अतिशय खतरनाक 'सत्तांध' चे मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांचे आहे.कवीस्नेही मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक:-सत्तांध(कवितासंग्रह)कवी:-, सचिन बेंडभर पाटील प्रकाशन:- यशोदिप पब्लिकेशन,पुणे मुखपृष्ठ:- संतोष धोंगडे प्रथमवृती:-५ सप्टेंबर २०२६किंमत:-२००/रूपये पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी शेवटची संधी

M.B.A. (HR, Marketing, Finance)

B.A.-(मराठी व उर्दू माध्यम)

B.C.A. (संगणक अनुप्रयोग)

M.A. मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

M.A. (English) (इंग्रजी)

9405109103, 8830838903